# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ५११/१३ मधील निशाण क्र. ५ वरील आदेश

१.　　　सदरचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार प्रतिवादींविरूध्द तात्पुरता मनाई आदेश पारित होण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जात नमूद मौजे करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील गट क्र. १०१ पैकी दक्षिणेची क्षेत्र १ हे. ६१ आर. ची मिळकत प्रतिवादीने दि. ३०/०४/२००१ रोजी करारपत्राने वादीला विकली आहे. त्याबाबत प्रतिवादीने लेखी करारपत्र करून दिले. परंतु सदरची मिळकत नवीन शर्तीची असल्याने मिळकतीच्या कब्जाबाबतचा उल्लेख दि. ३०/०४/२००१ रोजीच्या साठेखतात न करता त्याचदिवशी म्हणजे दि. ३०/०४/२००१ रोजी प्रतिवादीने वादीच्या नावे स्वतंत्र कब्जेपावती लिहून दिलेली आहे. त्यानुसार सदर मिळकतीमध्ये वादीची वहिवाट आहे. सदर मिळकतीमध्ये वादीने सन २००८ मध्ये विहीर खोदलेली आहे. दि. ३०/०४/२००१ रोजीच कराराचा मोबदला म्हणून वादीने प्रतिवादीला रक्कम रूपये ७५,०००/— दिले असून उर्वरीत रक्कम रू. ३३,०००/— वादी हा प्रतिवादीस देण्यास तयार होता व आहे. परंतु दि. ३०/०४/२००१ रोजीच्या करारानुसार सदर मिळकतीबाबत लागणारी परवानगी प्रतिवादीने आणलेली नाही. सदर परवानगी आणणेकरीता वादीने प्रतिवादीकडे मागणी केली होती. परंतु प्रतिवादीने आश्वासन देऊन देखील परवानगी आणलेली नाही. त्यामुळे वादीने दि. १०/०९/२०१३ रोजी वकिलामार्फत प्रतिवादीस नोटीस पाठवून कराराची पुर्तता करून देण्याची मागणी केली. सदरची नोटीस प्रतिवादीने घेण्यास नकारलेले आहे. त्यानंतर प्रतिवादी वादीस दावा

मिळकतीमधून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे सदरचा दावा आणि अर्ज वादीस दाखल करावा लागला आहे. सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादीने दावा मिळकतीमधील वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करून नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करण्याची विनंती वादीने शेवटी केलेली आहे.

२. सदर अर्जाला प्रतिवादींनी नि.क्र. १५ ला म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादींनी अर्जातील कथन स्पष्टपणे नाकारलेले आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादीकडे शेतीशिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन नाही. अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादीने कोणताही करार लिहून दिलेला नाही. तसेच कब्जेपावती देखील लिहून दिलेली नाही. तसेच अर्जात नमूद मिळकत नवीन शर्तीची नाही. अर्जात नमूद मिळकतीमध्ये दोन विहिरी पुर्वीपासून आहेत. प्रतिवादीच्या अडाणी आणि अशिक्षीतपणाचा फायदा घेऊन रस्त्याबाबत करार करण्याची गळ घालून प्रतिवादीच्या नावे वादीने कोरे स्टॅम्प घेऊन त्यावर प्रतिवादीचे अंगठे घेतले आहेत. सदर तथाकथित आंगठयांचा स्टॅम्पचा गैरवापर वादीने करून खोटा दावा आणि अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात नमूद मिळकत वादीचे वहिवाटीत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

३. सदर प्रकरणातील अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरीता मी खालील मुद्दे विचारात घेतलेले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादीच्या लाभात असल्याचे वादी सिध्द करतो का ? | : | .. नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने असल्याचे वादी सिध्द करतो का ? | : | .. नाही. |
| ३. | सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमीत हानी होणार असल्याचे वादी सिध्द करतो का ? | : | .. नाही. |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

४. सदर प्रकरणामध्ये वादींतर्फे विद्वान वकील श्री. बागल व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. एस.आर. जोशी (बार्डीकर) यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

मुद्दा क्र. १ ते ३ करीता :—

सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे कारणमीमांसेकरीता सदर मुद्दे एकत्रीत घेण्यात आलेले आहेत.

५. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकनावरून आणि दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांच्या युक्तिवादावरून सर्वप्रथम

याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर दावा वादीने खरेदीखत करून मिळणेकरीता व निरंतरचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. सदर प्रकरणातील वादीने कथित दि. ३०/०४/२००१ रोजीचे करारपत्र व कब्जेपावती नि.क्र. ३ सोबत दाखल केलेली आहे. सदर करारपत्र आणि कब्जेपावतीचे अवलोकन केले असता करारपत्र व कब्जेपावती हे नोंदणीकृत दस्त नसल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. तसेच नि.क्र. ३/२ ला दाखल केलेल्या दि. ३०/०४/२००१ रोजीच्या करारपत्रामध्ये कब्जाबाबत नमूद नाही. परंतु दि. ३०/०४/२००१ रोजीच्या नि.क्र. ३/३ ला दाखल केलेल्या कब्जेपावतीवरील कथनावरून प्रथमदर्शनी मिळकतीचा ताबा प्रतिवादीने वादीला दिल्याचे नमूद आहे. परंतु याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सद्य परिस्थितीमध्ये सदर करारपत्र व कब्जेपावती कायद्याच्या तरतुदींनुसार सिध्द झालेले नाहीत. त्यामुळे दि. ३०/०४/२००१ रोजीचे कब्जेपावतीप्रमाणे वादीची अर्जात नमूद मिळकतीमध्ये वहिवाट असल्याचे वादीने सिध्द केले आहे का ? हे पहाणे सर्वात महत्वाचे आहे. तसेच सदर दि. ३०/०४/२००१ रोजीचे कब्जेपावतीत नमूद मिळकतीच्या चतु:सिमा नमूद नाहीत. याउलट सदर प्रकरणामधील वादीने दाव्यामध्ये वादग्रस्त मिळकतीच्या चतु:सिमा नमूद केलेल्या आहेत. सदर चतु:सिमा वादीने कशाच्या आधारे नमूद केल्या आहेत हेदेखील प्रथमदर्शनी स्पष्ट होत नाही.

६. तसेच सदर प्रकरणामध्ये वादीने अर्जातील कथनाच्या पुष्ठ्यर्थ नि.क्र. २९ सोबत मौजे बार्डी येथील विजयकुमार गोडसे व अरूण

माळी यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर दोन्ही व्यक्तींनी प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जात नमूद मिळकतीमध्ये वादीची वहिवाट असल्याचे कथन केलेले आहे. याउलट सदर प्रकरणातील प्रतिवादीने नि.क्र. ३१ सोबत स्वत:चे प्रतिज्ञापत्र दाखल करून विजयकुमार गोडसे व अरूण माळी हे वादीचे नातेवाईक असल्याचे कथन केले आहे. तसेच सदर प्रकरणातील प्रतिवादीने म्हणण्याच्या पुष्ठ्यर्थ नि.क्र. २२ सोबत नवनाथ शिंगटे यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणातील दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, वादीने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील विजयकुमार गोडसे व अरूण माळी हे मौजे बार्डी येथील रहिवाशी असून प्रतिवादीने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील नवनाथ शिंगटे हे मौजे करकंब येथील रहिवाशी आहेत. सदर प्रकरणातील अर्जात नमूद वादग्रस्त मिळकत मौजे करकंब येथील असल्याचे देखील कागदपत्रावरून स्पष्ट होते. सदर प्रकरणातील वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रातील विजयकुमार गोडसे व अरूण माळी यांच्या मिळकती वादग्रस्त मिळकतीच्या बाजुला असलेबाबत स्वत:च्या तोंडी कथनाशिवाय इतर कोणतीही कागदपत्रे वादीतर्फे दाखल करण्यात आलेली नाहीत.

७.          सदर प्रकरणामध्ये वादीने नि.क्र. ३/१ ला मौजे करकंब येथील गट क्र. १०१ चा सन २०१२—१३ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उतारा हा सार्वजनिक दस्ताऐवज असून सदर ७/१२ मध्ये मालकाचे नाव म्हणून प्रतिवादी इस्माईलचे नाव आहे. सदरचा ७/१२ उतारा सार्वजनिक दस्ताऐवज असल्याने सदर दस्ताऐवजला

भारतीय पुरावा कायद्यातील तरतुदींनुसार पुरावा म्हणून सद्य परिस्थितीमध्ये वाचता येतो. तसेच सदर ७/१२ उताऱ्यामध्ये जमीन करणाऱ्याचे नावाच्या रकान्यामध्ये खुद्द म्हणून नमूद असून सदर ७/१२ उताऱ्यावरून वादग्रस्त मिळकत प्रतिवादीचे वहिवाटीत असल्याचे सद्य परिस्थितीमध्ये स्पष्ट होते.

८. सदर प्रकरणातील वादीने ज्या करारपत्रावरून दावा दाखल केलेला आहे तो सन २००१ सालामधील आहे. त्यामुळे सदरची बाब देखील विचारात घेणे जरूरीचे आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादीनेदेखील वादग्रस्त मिळकतीचे सन १९९५—९६ ते सन २०१२—१३ पर्यंतचे ७/१२ उतारे नि.क्र. २२ सोबत दाखल केलेले आहेत. सदर ७/१२ उताऱ्यांमध्ये देखील वादीचे नाव कोणत्याही रकान्यामध्ये नमूद नाही. सदर प्रकरणातील वादीला दि. ३०/०४/२००१ रोजीच्या करारपत्राप्रमाणे वादीला वादग्रस्त मिळकतीचा कब्जा मिळाला असे जरी युक्तिवादाकरीता गृहीत धरले तरी वादीने वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ सदरी वहिवाटदार म्हणून स्वतःचे नाव दाखल करून घेण्याकरीता कोणते प्रयत्न केले हे पहाणे देखील महत्वाचे आहे. सदर प्रकरणातील वादीने वादग्रस्त मिळकतीचे ७/१२ सदरी स्वतःचे नाव दाखल करणेसाठी प्रयत्न केलेबाबत कोणतीही कागदपत्रे वादीने प्रकरणामध्ये दाखल केलेली नाहीत. त्यामुळे सदर प्रकरणातील पक्षकारांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून माझे असे मत झाले आहे की, वादग्रस्त मिळकतीमध्ये प्रथमदर्शनी कब्जा सिध्द होण्यासाठी वादीने दाखल केलेल्या पुराव्यापेक्षा प्रतिवादीचा पुरावा जास्त विश्वासार्ह आहे. त्यामुळे केवळ दि. ३०/०४/२००१ रोजीचे कब्जेपावती नुसार वादीला मिळकतीचा ताबा प्रत्यक्ष मिळाल्याचे सद्य परिस्थितीमध्ये

सिध्द होत नाही. याउलट सदर प्रकरणातील प्रतिवादीतर्फे विद्वान वकिलांनी युक्तिवादामध्ये दि. ३०/०४/२००१ रोजीचे करारपत्र आणि कब्जेपावतीच्या कायदेशीर मुल्यांबाबत युक्तिवाद केला. परंतु सदर दि. ३०/०४/२००१ रोजीचे करारपत्र आणि कब्जेपावती कायदेशीर आहे किंवा नाही ही बाब सदर प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्यावेळी स्पष्ट होणार आहे.

९.　　　　त्यामुळे सद्य परिस्थितीमध्ये दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून माझे असे मत झाले आहे की, वादग्रस्त मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. तसेच सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रावरून वादग्रस्त मिळकतीमधील कब्जाबाबतचा न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे दाखल पुराव्यावरून सिध्द होत नाही. त्यामुळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश पारित केल्यास वादीपेक्षा प्रतिवादीच अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे माझे असे मत झाले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार पारित करण्यासाठी लागणारे घटक प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमीत हानीचा मुद्दा वादीचे बाजुने असलेबाबत वादींनी सिध्द केलेले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ ला 'नकारार्थी' निष्कर्ष नोंदवित आहे.

मुद्दा क्र. ४ करीता :—

१०.　　　　वर नमूद चर्चा व सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते की, वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९

नियम १ व २ खालील तरतुदींनुसार लागणारे महत्वाचे घटक सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. नि.क्र. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढयात आला.

सही/—

दिनांक — ०५/०७/२०१४          ( शि. म. गौरगोंड )

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.